**दिनांक ३०.०१.२०२५ रोजी ता.वेरुळ जि.छ.संभाजीनगर येथे ड्रॅगन फ्रूट शेतीची पाहणी केली**




**दिनांक ३०.०१.२०२५ रोजी मौजे पळसवाडी ता.खुलताबाद येथील शेतकरी कंपणीला भेट**

दैनिक जय महाभारत
संपादक – विजयकुमार वाव्हळ

# पळसवाडी येथील शेतकरी कंपनीस भेट

खुलताबाद / बाबा दांडगे (दै महाभारत)

वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी येथील घृष्णेश्वर ॲग्रो प्रोड्युसर शेतकरी कंपनी ला भेट दिली. यावेळी अध्यक्ष अनिल हारदे व सचिव यादव दिगंबर जगताप यांनी कंपनी ची माहिती दिली. या शेतकरी सभासद संख्या १५८० असलेली कंपनी ची स्थापना २ जुलै २०१५ या वर्षी झालेली आहें सध्य स्थितीत कंपनी चा २०२३ – २४ या वर्षीची वार्षिक उलाढाल ४ कोटी पर्यंत आहे. कंपनी मार्फत सभासदांना ठराविक दरात क्लीनिंग, ग्रेडिंग, करून दिली जाते बिगर सभासदांना मार्केट रेट




प्रमाणे ही कामे करून दिली जातात. कंपनी अंतर्गत नाफेड खरेदी केंद्राद्वारे मका, सोयाबीन, तूर,हरभरा, गहू ज्वारी इत्यादी मालाची हमीभावाने खरेदी केली जाते अशी माहिती अनिल हारदे यांनी दिली.पंचक्रोशीतील शेतकरी सभासद आहेत ही माहिती यादव जगताप यांनी दिली. यावेळी सपंर्क अधिकारी कृष्णकुमार देठे रंगनाथ पिसाळ, एन .के.हेलो पाटील कृषी विभागाचे अधिकारी मंडळ कृषी अधिकारी किशो पाडळे, कृषी सहायक गिराम मॅड सह कर्मचारी उपस्थि होते.यावेळी शेतकरी शिवाज औटे, अनिल हारदे, संतोष हारदे संतोष ठेंगडे उपस्थित होते...

02 Feb 2025 - Page 3 | dailymahabharat.com
Powered by softisky | 9764331134

**दिनांक ३०.०१.२०२५ रोजी मौजे पळसवाडी येथील शेतक-यांसोबत 'आपल्या शेतातील पेरणीचे बी आपल्याच घरी' याबाबत चर्चा व मार्गदर्शन**

दैनिक अजिंक्य केसरी

प्रतिनिधी मच्छिन्द्र घोरपडे

# निलेश केशवराव हेलोंडे पाटील यांची पळसवाडी गावाला भेट!

**खुलताबाद (अजिंक्य केसरी) :** ॲड. निलेश हेलोंडे अध्यक्ष कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य यांनी पळसवाडी ता. खुलताबाद येथे भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांनी पुढच्या हंगामासाठी साठवलेल्या सोयाबीन बियाण्याची पाहणी केली. खरीप २०२४ मध्ये एमजीएम कृषि विज्ञान केंद्र, गांधेली या कार्यालया मार्फत पळसवाडी गावात ३८ शेतकऱ्यांच्या शेतावर सोयाबीन चे समूह पिक प्रात्यशिके घेण्यात आली होती. या मध्ये एम.ए.यु.एस ६१२ व के.डी. एस ७५३ या नवीन सुधारीत वाणांच्या वापर करण्यात आला होता. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार या प्रात्यक्षिकाद्वारे एकूण ४०० क्वि. सोयाबीन चे उत्पन्न या गावात झालेले आहे. सोयाबीन चे वाण सुधारित असल्यामुळे सदरील बियाणे पुढील हंगामात उपयोगात येणार आहे असे शेतकऱ्यांना प्रशिक्षण व शेतीदिना दरम्यान काकासाहेब सुकासे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख यांनी सुचवल्या प्रमाणे शेतकऱ्यांनी स्वत: पुरते बियाणे पुढील हंगामासाठी साठवून ठेवलेले आहे. या उपक्रमाचे हेलोंडे पाटील यांनी येथील शेतकऱ्यांचे कौतुक केले.



यावेळी संपर्क अधिकारी कृष्णकुमार देठे, रंगनाथ पिसाळ, मंडळ कृषी अधिकारी किशोर पाडळे, कृषी सहाय्यक जि. व्ही. गीराम, शेतकरी शिवाजी औटे, विलास ठेंगडे, यादवराव जगताप, अनिल हारदे, संतोष हारदे, संतोष ठेंगडे, विशाल जगताप आदींसह गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दिनांक ३०.०१.२०२५ रोजी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न् प्रक्रीया उदयोग अंतर्गत श्री गणेश खाडे, गदाना ता. खुलताबाद यांचे लोणचे उदयोगाला भेट**






दिनांक ३०.०१.२०२५ रोजी आदर्शडेरी बाजार, सांगवी येथे भेट




दिनांक ३०.०१.२०२५ रोजी मौजे खुलताबाद येथे अद्रक ड्रायर प्रक्रीया उदयोगाला भेट



दिनांक ३१.०१.२०२५ रोजी जिल्हाधिकारी व इतर विभाग प्रमुख यांचे सोबत जिल्हाधिकारी कार्यालय धाराशीव येथे बैठक



दिनांक ३१.०१.२०२५ रोजी जिल्हाधिकारी व इतर विभाग प्रमुख यांचे सोबत जिल्हाधिकारी कार्यालय लातुर येथे बैठक



दिनांक ३१.०१.२०२५ रोजी लातुर मैदान येथे जि.प. मार्फत आयोजीत उमेद कार्यक्रमामध्ये बचत गटाचे दुकानांना भेट

